## प्रकरण दुसरे

## बॅ.वि.दा.सावरकर यांचे जातिनिर्मूलनाविषयीचे विचार

## प्रकरण दुसरे

## बॅ.वि.दा.सावरकर यांचे जातिनिर्मूलनाविषयीचे विचार

### सावरकरांचे संक्षिप्त चरित्र:

स्वातंत्र्यवीर बॅ. विनायक दामोदर सावरकर हे एक असामान्य व्यक्तिमत्व होते. बुध्दीवादी लेखक, प्रतिभावंत कवी, क्रांतिकारी देशभक्त, थोर विचारवंत, कृतिशील नेते, तत्वनिष्ठ राजकारणी, समाज क्रांतीचा उद्गाता अशा अनेक नात्याने ते भारतीयांना परिचित आहेत. त्यांनी आपली एक स्वतंत्र अशी प्रतिमा निर्माण केली आहे. आपल्या वैशिष्टय-पूर्ण अशा विचारांची, तत्वज्ञानाची अमूल्य भर भारतीय विचारात घातलेली आहे. आपल्या विज्ञाननिष्ठ विचारांची देणगी भारताला दिली आहे.

बॅ. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी चित्पावन ब्राम्हण ज्ञातीत झाला. सावरकरांचे प्राथमिक शिक्षण भगूर या त्यांच्या जन्मगावी झाले. तर माध्यमिक शिक्षण नाशिक येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुणे येथे आले. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांनी सार्व-जनिक कार्याला सुरुवात केली. १ जानेवारी १९०० रोजी त्यांनी "मित्रमेळा" सुरु केला.[१] त्यानंतर पुढे याच गुप्त संघटनेला "अभिनव भारत" हे नाव दिले गेले.

२१ डिसेंबर १९०५ रोजी सावरकर बी.ए.ची परिक्षा उत्तीर्ण झाले. ९ जून १९०६ रोजी पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून ते लंडनला रवाना झाले.[२] लंडनमध्ये विद्यार्थी दशेत असताना अनेक विचारवंतांच्या विज्ञानवादी विचारांचा प्रभाव सावरकरांवर पडला. वास्तविक लहानपणी सावरकर अत्यंतिक दैववादी व देवभक्त होते. परंतु ईग्लंडमधील वास्तव्यात सावरकरांच्या वाचनात ऑगस्त कॉम्प्त, चार्लस रॉबर्ट डार्विन, जॉन

स्टुअर्टमिल, हर्बर्ट स्पेन्सर यांचे ग्रंथ आले. अज्ञेय तत्त्व, जडद्वैतवाद, उत्क्रांतीवाद, उपयुक्ततावाद या विचारसरणींचा सावरकरांच्या मनावर फार परिणाम झाला. विशेषत: चार्लस डार्विनच्या "द ओरिजन ऑफ स्पेसीज" या ग्रंथाचा प्रभाव सावरकरांवर पडला. "जीवन कलहात श्रेष्ठतम असतो तोच जगतो" (Surrvival of the fittest) या सिध्दान्ताचा प्रभाव सावरकरांवर इतका पडला की त्यांनी हिन्दू राष्ट्राच्या संघटनाच्या व सामर्थ्याच्यादृष्टीने या सिध्दान्ताचा वारंवार पुनरुच्चार केला आहे.[3] हिन्दू राष्ट्र या जीवनकलहात टिकून राहण्यासाठी जास्तीजास्त बलवत्तर कसे बनेल याचा विचार सावरकरांनी सातत्याने केला आहे.

याच काळात सावरकरांच्या वाचनात जोसेफ मॅझिनीचे चरित्र आले. त्यांच्या राष्ट्रवादी भावनेने सावरकर प्रभावित झाले.[४] तसेच इंग्लंडमध्ये असताना सावरकरांचा लाला हरदयाळ, मॅडम कामा यांच्याशी परिचय झाला. त्यांच्या विचारांचा व कार्याचा प्रभावही सावरकरांवर पडला. या सर्वातून स्फूर्ति घेऊन सावरकरांनी इंग्लंडमधील भारतीय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राभिमान व स्वातंत्र्यप्राप्तीची भावना निर्माण करण्याच्या प्रयत्नांना सुरुवात केली. ही स्वातंत्र्याची भावना प्रबळ करण्यासाठी "लंडनची बातमीपत्रे" लिहिण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात सावरकरांचा सशस्त्र क्रांतीच्या मार्गावर विश्वास होता. केवळ सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकेल अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे याकाळात त्यांनी मागण्या, विनंत्या, निवेदने या नेमस्त मार्गांना विरोध केला.

सावरकरांनी इंग्लंडमध्येही "अभिनव भारत" या गुप्त संघटनेद्वारे अनेक चळवळी, समारंभ, उत्सव, कार्यक्रम घडवून आणले. या सर्व चळवळींचा परिणाम होऊन सावरकरांना मार्च १९१० मध्ये अटक करण्यात आले.[५] बॉम्ब व पिस्तुल पुरविणे, राजद्रोही कारवाया करणे असे आरोप त्यांच्यावर

ठेवण्यात आले. तसेच कर्झन वायली व नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांच्या हत्येमुळे सावरकरांवरील ब्रिटीश सरकारचा संशय जास्तच बळावला. जुलै १९१० रोजी सावरकरांना लंडनहून मुंबईत आणण्यात आले.[६] सप्टेंबर १९१० पासून सावरकरांवरील खटल्याच्या कामकाजाला सुरुवात झाली. २४ डिसेंबर १९१० रोजी पहिल्या खटल्यात सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. तर ३० जानेवारी १९११ या दिवशी दुसरी जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. ३० ऑगस्ट १९११ रोजी सावरकरांना अंदमानच्या कारागृहात बंदी म्हणून आणण्यात आले.[७]

अंदमानातही सावरकरांनी बरेच कार्य केले. त्यांनी बंदिवानांमध्ये साक्षरतेचा प्रसार केला. त्यांना हिन्दू संघटन व साक्षरता यांचे महत्त्व पटवून दिले. अंदमानातील कारागृहात सावरकरांच्या असे लक्षात आले की मुसलमान जामदारांकडून हिंदी बंदीवानांना पक्षपाताची व अन्यायकारक वागणूक मिळत आहे. तसेच मुस्लिम बंदीवानांकडूनही हिन्दूंच्या धर्मांतराचा पध्दतशीर प्रयत्न केला जात आहे. या सर्व प्रकाराने सावरकरांची हिन्दुत्वाची भावना उफाळून आली आणि मुस्लिमांच्या धार्मिक वेडाचाराने हिन्दुंच्या जातिय जीवनाचा बळी जाऊ नये, व हिन्दू समाजाचे संख्याबळ कमी होऊ नये यासाठी त्यांनी हिन्दुत्वाचा प्रचार व पुरस्कार करण्याच्या धोरणाला अग्रक्रम देण्याची योजना निश्चित केली.

वास्तविक इंग्लंडमधील वास्तव्यातच सावरकरांच्या मनात हिन्दुत्वनिष्ठ विचार मूळ धरु लागले होते. "माझी जन्मठेप" मध्ये सावरकरांनी लिहिले आहे. "इंग्लंडमध्ये असतानाच हिन्दूच्या सांप्रदायिक कलहाने हिन्दुत्वाचे खंड खंड पडून आपल्या अखिल जातिस एका सूत्रात, एका ध्वजाखाली आणण्याचे सामर्थ्य सद्य:स्थितीत ज्या एका शब्दात उरले आहे तो "हिन्दू" शब्द आमक विद्वेषाच्या घावाने पंगू होईल ही भीती आम्हास चिंता उत्पन्न करु

लागली आहे.[८] पुढे अंदमानातील मुस्लिमांच्या धर्मांतरांच्या प्रकारांनी त्यांच्या मनात हिन्दु राष्ट्राच्या सामर्थ्याचा व संख्याबळाचा प्रश्न निर्माण झाला. अंदमानात असतानाच मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणाच्या प्रवृत्तीला शह देण्यासाठी हिन्दू संघटना हा एकमेव पर्याय आहे हे त्यांनी जाणले. त्यातून त्यांच्या "हिन्दुत्व" या ग्रंथाची निर्मिती झाली. अंदमानच्या कारागृहातील शीख, आर्य समाजी व इतर हिन्दू बंदीवानांना "हिन्दू" शब्दाचा अर्थ स्पष्ट करुन सांगताना त्यांनी चर्चेच्या रुपाने जे विचार मांडले तेच पुढे "हिन्दुत्व" या पुस्तकाच्या रुपाने प्रसिध्द झाले.[९]

मे १९२१ मध्ये सावरकरांना अंदमानच्या तुरुंगातून रत्नागिरीच्या तुरुंगात आणण्यात आले.[१०] रत्नागिरीच्या तुरुंगातही त्यांनी पुन्हा शिक्षणप्रसार, साक्षरता, शुध्दी चळवळ या प्रयत्नांना सुरुवात केली. तेथून त्यांना येरवडा येथील कारागृहात नेण्यात आले. या दरम्यान सावरकरांच्या सुटकेसाठी अनेक नेत्यांनी प्रयत्न केले. शेवटी ६ जानेवारी १९२४ रोजी सावरकरांची सशर्त मुक्तता करण्यात आली.[११] त्यामुळे १९२८ ते १९३६ हा काळ त्यांना रत्नागिरीत स्थानबध्दतेत काढावा लागला. या काळात त्यांच्यावर राजकारणात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भाग न घेण्याविषयी निर्बंध घालण्यात आले. त्यामुळे सावरकरांनी या काळात सामाजिक क्षेत्र हे आपले कार्यक्षेत्र बनविले.

स्थानबध्दतेच्या काळात सावरकरांनी केलेले सामाजिक कार्य बहुविध स्वरुपाचे आहे. सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने त्यांनी अस्पृश्यता निवारण, जन्मजात जातिभेदाचे उच्चाटन, शुध्दी चळवळ, पतित पावन मंदिराची स्थापना, हिन्दु संघटन असे अनेक उपक्रम हाती घेतले. अस्पृश्यता-निवारणासाठी त्यांनी पुणे, मुंबई, वसई, अमरावती अशा अनेक ठिकाणी सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणले. स्पृश्यास्पृश्य स्त्रियांचे हळदीकुंकु समारंभ, दसरा-

संक्रांतीसारखे सण, सत्यनारायण असे उपक्रम हाती घेतले व सर्वत्र जातिभेदाविरुद्ध धडाक्याने प्रचार सुरु केला. त्यासाठी १९३० साली एका नाटयगृहात जातिभेद निर्मूलनाच्या कार्याचा संकल्प सोडला.[१२] पुढे "केसरी" मध्ये "जन्मजात जातिभेदोच्छेदक निबंध" अशी नऊ लेखांची मालिका लिहीली.

मंदिर प्रवेशाची बंदी, वेदोक्तबंदी यासारख्या अन्यायकारक रुढीमुळे आजपर्यंत नाकारण्यात आलेले धार्मिक हक्क अस्पृश्यांना देणे आणि सवर्णांच्या बरोबरीने अस्पृश्यांनाही मंदिरप्रवेश मिळवून देणे या हेतूने त्यांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्याचा आग्रह धरला. तसेच अस्पृश्य व सवर्ण यांच्यासाठी अखिल हिन्दू देवालये बांधण्याचा विचार मांडला. त्यादृष्टीने अखिल हिन्दू जातिंसाठी २२ फेब्रुवारी १९३१ या दिवशी रत्नागिरी येथे पतितपावन मंदिराची स्थापना केली.[१३] त्यांच्या या कार्याचा अनेकांनी गौरव केला आहे. फेब्रुवारी १९३१ मध्ये महर्षी वि.रा. शिंदे व त्यांच्या दलित वर्ग मिशनने पतितपावन मंदिरात एक परिषद आयोजित केली होती. या परिषदेच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी "सावरकरांनी आमचे स्वप्न रत्नागिरीत साकार करुन दाखविले."[१४] असे उद्गार काढले. अशाप्रकारे पतितपावन मंदिर हे अखिल हिन्दू जातीत समता निर्माण करण्याच्या चळवळीचे विद्यापीठ होऊन राहिले आहे.

१९३७ साली सावरकरांची स्थानबध्दतेतून मुक्तता झाली. राजकीय निर्बंध निघाल्यामुळे त्यांनी राजकारणात सक्रीय सहभाग घेतला आणि राजकीय क्षेत्राचा उपयोग हिन्दू संघटन निर्माण करण्याचे साधन यादृष्टीने केला. त्यांनी १ ऑगस्ट १९३७ रोजी लोकशाही स्वराज्य पक्षात प्रवेश केला. थोड्याच अवधीत ते हिन्दू महासभेस मिळाले. हिन्दू महासभेत राहून त्यांनी हिन्दुत्व, हिन्दू राष्ट्र यांचा आग्रहाने पुरस्कार केला. १९३७ पासून १९४३ पर्यंत त्यांना सतत सात वर्षे हिन्दू महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद

मिळाले. १९३७ मध्ये अहमदाबाद येथे भरलेल्या अधिवेशनात पाकिस्तान-च्या निर्मितीविषयी धोक्याची सूचना केली. त्यादृष्टीने अखंड व एकात्म हिन्दू राष्ट्राच्या कल्पनेचा सातत्याने विचार मांडला. परंतु १९४७ मध्ये भारत व पाकिस्तान अशी फाळणी झाल्यामुळे त्यांची मागणी पूर्ण झाली नाही.

३० जानेवारी १९४८ हा दिवस सावरकरांच्या राजकीय जीवनाचा शेवट करणारा ठरला. या दिवशी महात्मा गांधींची हत्या झाली. सावरकरांना या हत्येच्या आरोपामुळे एक वर्षापेक्षा जास्त काळ कारा-गृहात काढावा लागला. अर्थात या आरोपातून त्यांची निर्दोष मुक्तता झाली. परंतु या घटनेचा विपरित परिणाम त्यांच्या पुढील राजकीय व सार्वजनिक जीवनावर आणि कार्यावर झाला. १९५० च्या दरम्यान त्यांनी राजकारणातून निवृत्त होण्याचा निर्णय जाहिर केला. तसेच १० मे १९५२ या दिवशी त्यांनी स्थापन केलेल्या "अभिनव भारत" या गुप्त संघटनेचे विसर्जन केल्याचेही जाहिर केले.

सावरकर राजकारणातून निवृत्त झाले असले तरी देशांतर्गत व बाह्य घडामोडींकडे ते विशेष जागरूकतेने लक्ष देत. १९६२ च्या भारत-चीन व १९६५ च्या भारत-पाकिस्तान युध्दाविषयी त्यांनी आपल्या प्रतिक्रिया मांडल्या आहेत. १९६३ मध्ये वृध्दपकाळ व प्रकृती अस्वास्थ यामुळे काही काळ त्यांना रुग्णालयात रहावे लागले. अखेरीस ३ फेब्रुवारी १९६६ पासून त्यांनी प्रायोपवेशनाला सुरुवात केली. २३ दिवसांच्या प्रायो-पवेशनानंतर २६ फेब्रुवारी १९६६ यादिवशी सावरकरांचे निधन झाले.

भारतातील राष्ट्रीय भावनेच्या विकासाला जाति संस्थेचा मोठाच अडसर आहे हे सावरकरांच्या लक्षात आले होते. म्हणून त्यांनी त्यांच्या

वेगवेगळ्या पुस्तकांतून जातिभेदावर मोलाचा विचार व्यक्त केला. जातीचा उच्छेद केल्याशिवाय खरे हिन्दुराष्ट्र स्थापन होणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी जात्युच्छेदक निबंध लिहिले. त्यांच्या मते हिंदु समाजाच्या -हासास त्या समाजाभोवती बांधलेल्या सप्तशृंखला कारणीभूत आहेत.

२) हिन्दू समाजाच्या -हासाची कारणे: अर्थात सप्तशृंखला.

सावरकरांच्या एकंदर विचारांमध्ये सामाजिक सुधारणा व जातिभेद निर्मूलन याविषयीचे विचार विशेष प्रकर्षाने प्रकट झाले आहेत. सावरकर थोर विचारवंत होते हे मान्य करूनही असे म्हणावे लागते की ते केवळ तत्त्वचिंतक नव्हते तर कृतीशील नेते व कार्यकर्ते होते. त्यांची स्वतंत्रप्रज्ञा केवळ तत्त्वचिंतनात्मक विवेचनाच्या बंधनात अडकून पडलेली नव्हती. तर तिला प्रत्यक्ष कृतीची जोड होती. प्रा. मोरे यांच्या मते सामाजिक पुनर्रचनेचा बीजविचार, समाजस्थितीची बुध्दीवादी समीक्षा व भविष्यवेधी विचार प्रतिपादन ही सावरकरांच्या तत्त्वज्ञानाची तीन वैशिष्टये होती. त्यामुळेच त्यांना भारताच्या तत्कालीन समाजस्थितीचा, समस्यांचा अचूक वेध घेणे शक्य झाले.

त्यांनी सतत हिन्दू समाजाच्या उन्नतीचा व प्रगतीचा विचार केला. हिन्दू समाजाचे पुनरुत्थान हे सावरकरांचे प्रमुख ध्येय होते. या ध्येयपूर्तीच्या मार्गात प्राचीन धर्मग्रंथ, जातिव्यवस्था, अंधश्रध्दा, चालीरिती अशा अनेक समस्या आहेत, हे त्यांनी ओळखले. म्हणून त्यांनी हिन्दू राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सामाजिक सुधारणेला विशेषतः जातिभेद निर्मलनाच्या कार्यक्रमाला अग्रक्रम दिला.

रत्नागिरीला स्थानबध्दतेत असताना सावरकरांनी सामाजिक क्षेत्रातील

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सुधारणा हे आपले कार्यक्षेत्र बनविले. त्यावेळी हिन्दू समाजाच्या अधोगतीचे व अपकर्षाचे मूळ जातिसंस्थेत आहे हे त्यांना समजले. त्यांनी जातिभेदाच्या अनिष्ट स्वरूपाची कारणमीमांसा केली आहे. त्यांच्यामते जतिभेदाचे सर्वांत अनिष्ट व घातक स्वरूप म्हणजे काळाच्या ओघात निर्माण झालेली "सप्तबंदी" होय. या सप्तबंदीमुळे हिन्दू राष्ट्र एकसारखे विघटीत व दुर्बल बनत आहे. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधु-बंदी, शुद्धीबंदी, रोटीबंदी, आणि बेटीबंदी यासारख्या विकृत बेड्या हिन्दू समाजाने स्वत:च आपल्या पायात ठोकून घेतल्या आहेत. जातिभेदाच्या अतिरेकी वेडाचाराने हिन्दू समाजाने आपली शक्ती, सामर्थ्य व संघटन गमावली आहे. हजारोवर्षांपासून या तथाकथित सप्तबंदीने हिन्दू समाजाचा सर्वच बाजूंनी -हास चालविला आहे हे त्यांनी आपल्या "जात्युच्छेदक निबंधात" विस्ताराने स्पष्ट केले आहे.[१५]

१) <u>वेदोक्तबंदी:</u>

या पहिल्या अनिष्ट मर्यादेमुळे हिन्दू समाजाचा फार मोठा भाग अध्ययनाच्या हक्काला मुकला आहे. धर्मग्रंथावर सर्व हिन्दू धर्मीयांचा समान हक्क असताना त्यांना आपले धर्मग्रंथ वाचता येत नाही. म्हणून ते म्हणतात "सर्व हिन्दू मात्रांस वेदादिक यच्चयावत् धर्मग्रंथांवर समान हक्क असला पाहिजे. वेदादि ग्रंथ मनुष्यमात्राला उघडे करून आध्रुवध्रुव वैदिक अध्ययन चालू करण्यातच "वैदिक" धर्माचा धार्मिकदृष्टीने देखील खरा विजय आहे."[१६]

२) <u>व्यवसायबंदी:</u>

जातिसंस्थेचे मूलभूत वैशिष्ट्य म्हणजे ती ज्या जातिमध्ये जन्म घेते त्याच जातीचा परंपरागत व्यवसाय तिला करावा लागतो. या बेडीमुळे व्यक्ती स्वत:-च्या आवडीप्रमाणे व अंगभूत गुणानुसार पाहिजे तो व्यवसाय निवडू शकत

नाही परंतु "ज्या व्यक्तीस जो व्यवसाय करण्याची धामक नि इच्छा असेल त्यास तो करता आला पाहिजे"[१७] असा व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार त्यांनी केला आहे.

३) स्पर्शबंदी: स्पर्शबंदीसारख्या अमानवीय शृंखलेमुळे हिन्दू समाजाचा मोठा भाग असलेला अस्पृश्य का बाजूला पडला आहे. स्पर्शबंदी, स्पृश्यास्पृश्यता हे सर्व मानवनिर्मित, व पोथीजात भेद असून त्यांना कोणताही शास्त्रीय आधार नाही,[१८] असे त्यांचे मत होते.

४) सिंधुबंदी:

सिंधुबंदी किंवा अटकबंदीमुळे परदेशगमन, सागरप्रवास निषिध्द मानला गेला आहे. जातिभेदनिर्मूलनाच्या व एकात्म हिन्दू राष्ट्राच्या निर्मितीच्यादृष्टीने सिंधुबंदी ही एक समस्या आहे.[१९] या बंदीमुळे देशोदेशी वस्ती करुन असलेले लक्षावधी लोक हिन्दू राष्ट्राला अंतरले आहेत. हिन्दू संस्कृती व हिन्दू धर्म यांची बळकट बंधाने तुटून ते अहिंन्दूच्या पक्षात जाऊन हिन्दू राष्ट्राचे सामर्थ्य व संघटन क्षीण होत आहे.

५) शुध्दीबंदी:

शुध्दीबंदीसारख्या अत्यंत घातक रुढीचा विचार सावरकरांनी एकात्म व संघटित हिन्दू राष्ट्राच्यादृष्टीने केला आहे. शुध्दीकार्य अत्यंत आवश्यक आहे. परंतु मंदिरबंदी, शुध्दीबंदी, सिंधुबंदीच्या अडसरामुळे परधर्मात गेलेल्या हिन्दूंच्या मनात असतानाही त्यांना पुन्हा हिन्दू धर्मात येतायेत नाही.[२०] त्यामुळे परधर्मात गेलेल्या हिन्दूंना शुध्दीकृत करुन हिन्दू धर्माचे संख्याबळ व सामर्थ्य वाढविता येत नाही.

६) रोटीबंदी:

सावरकरांच्या मते, रोटीबंदी हा जातिप्रथेचा मुख्य आधारस्तंभ आहे. रोटीबंदीची बेडी अत्यंत घातकी असून तिच्यातून शुध्दीबंदी, सिंधुबंदी-सारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.[२१] खाण्याने जात जाते, धर्म बुडतो ही भावना अत्यंत हुळचट व राष्ट्रघातकी आहे. परंतु "धर्माचे स्थान हृदय आहे पोट नव्हे"[२२] असे सांगून या प्रथेला विज्ञानाचा कोणताही आधार नाही हे त्यांनी पटवून दिले आहे.

७) बेटीबंदी:

बेटीबंदीची तटबंदी हिन्दू राष्ट्राची शकले पाडण्यास कारणीभूत झालेली आहे. जात्यंतर्गत विवाहाच्या पध्दतीमुळे अनुरुपता, अनुवांशिकता या शास्त्रीय पध्दतींचा फायदा समाजाला मिळत नाही. मुक्त सामाजिक अभिसरणाच्यादृष्टीने ही रुढी घातक आहे. रक्त व वंशशुध्दी कायम ठेवण्यासाठी ती उपयुक्त ठरलेली नाही.

अशाप्रकारे सावरकरांनी जातिसंस्थेची वर्षानुवर्षे कायम असलेली वैशिष्टये जी शृंखला बनून समाजाचा सर्व बाजूंनी ऱ्हास करीत होती ती सप्तबंदीच्या स्वरुपात स्पष्ट केली आहेत. अनेक लेख, निबंध, भाषणे या माध्यमातून त्यांनी जन्मजात जातिप्रथेचे व सप्तबंदीचे अनिष्टत्व सांगितले आहे. हिन्दू समाजाच्या ऱ्हासाचे, त्याच्या अधः-पतनाचे आणि विघटन व पराभवाचे जातिसंस्था हेच केवळ कारण असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

### ३. हिन्दू समाजाच्या ऱ्हासास जातिव्यवस्था कारण:

हिन्दू समाजाच्या ऱ्हासाची कारणमीमांसा करताना जातिव्यवस्था सदोष मानून सावरकर तिच्यावर वैचारिक प्रहार करतात. केवळ पोथीजात जातिभेदामुळे हिन्दू समाजाची अधोगती होत असल्याचा विचार त्यांनी मांडला आहे. मानीव जातिभेद हा हिन्दू समाजव्यवस्थेला असलेला सर्वात मोठा शाप आहे. "या महाशापामुळे हिन्दू समाजाचा सामर्थ्यशाली प्रवाह वाळवंटात नि डबक्यात मुरून नष्ट होऊन जाण्याचे भय आहे."[२३] या जातिभेदामुळे हिन्दू समाज दिवसेंदिवस दुबळा होत आहे. यासाठी जातिभेदाचे उच्चाटन करून तो संपविला पाहिजे. या जातिभेदाला शास्त्राचा किंवा धर्माचा कोणताही आधार नाही. ती एक कालमृत संस्था आहे. जाति व धर्म याविषयीचे त्यांचे विचार अत्यंत प्रागतिक होते. "जन्मना जायते हिन्दू" हे त्यांच्या विचारांचे मुख्य सूत्र होते. मनुष्याचा जन्म ज्या एकमेव जातीत होतो ती म्हणजे मनुष्यजात. बाकी सर्व जाति मानीव आहेत. त्या नष्ट केल्या पाहिजेत. म्हणजे त्यांचे मानीव श्रेष्ठत्व वा नीचत्व नष्ट केले पाहिजे.[२४]

अंदमानातून मुक्तता झाल्यानंतर १९२५ ने १९३७ पर्यंतचा काळ त्यांना स्थानबध्दतेत काढावा लागला. राजकीय कार्यात प्रत्यक्षपणे भाग घेण्याची त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. त्यामुळे याकाळात सामाजिक सुधारणा हे त्यांनी आपले कार्यक्षेत्र बनविले. हिन्दू समाज, चालीरिती, अंधश्रध्दा, जातिप्रथा, सामाजिक विषमता यांचा त्यांनी सुधारणावादी दृष्टीकोनातून विचार केला. तेव्हा जातिव्यवस्था हिन्दू समाजाच्या ऱ्हासास कारण असल्याचे त्यांना जाणवले. या जातिप्रथेने व सामाजिक विषमतेने अनेक वर्षापासून जाति-जातित भेदाच्या तटबंदी निर्माण केल्या आहेत. या जातिप्रथेमुळे हिन्दू समाजाचे सामर्थ्य, संघटन व शक्ती क्षीण होत आहे. यासाठी

त्यांनी स्थानबध्दतेच्या काळात जातिभेद निर्मूलनाचे कार्य हाती घेतले. जातिभेदाचा उच्छेद करण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतले. लेख, निबंध भाषणे या माध्यमातून त्यांनी जातिभेदाचे हानिकारक स्वरुप विशद केले आहे. १९३० साली त्यांनी "केसरी"त जातिभेद व सामाजिक विषमता याविषयावर त्यांनी ९ लेख लिहीले. पहिल्याच लेखाच्या सुरुवातीला ते लिहितात, "अर्थात आपल्या हिन्दू राष्ट्राच्या उत्कर्षाचे श्रेय जसे या आपल्या जीवनाच्या तंतूतंतूशी गुंफुन राहिलेल्या जातिभेदास असण्याचा उत्कट संभव आहे, तसाच आपल्या राष्ट्राच्या अपकर्षाविषयी तीच संस्था बलवत्तर कारण असण्याचाही तितकाच उत्कट संभव आहे."[२५] सुरुवातीच्या काळात समाजाला एकात्म ठेवण्यासाठी जातिसंस्था निर्माण झाली असली तरी त्यानंतरच्या काळात जातिबंधने जाचक बनत गेली व हिन्दू समाजाची अधोगती सुरु झाली. त्यातही मूळचे चातुर्वर्ण्य जे" गुणकर्मविभागश: होते" ते लोपत जाऊन आजच्या जन्मनिष्ठ जातिभेदाचा फैलाव होऊ लागला, त्यावेळी आणि तसाच आपल्या हिन्दूस्थानचाही अध:पातही होत आला, आणि ज्यावेळी बेटीबंद आणि रोटीबंद जातिभेदाने अत्यंत उग्र स्वरुप धारण केले तोच काळ आपल्या अध:पाताची परमावधी करणारा ठरला."[२६] अशाप्रकारे गुणकर्मविभाग गीतेत राहिला, व्यवहारात उरला तो केवळ जन्मसिध्द जातिवाद.

आजचा जातिभेद हा एक मानीव आचार आहे. तो विकृत व हानिकारक आहे. हा आचार बदलणे म्हणजेच मानीव जातिभेदाचे उच्चाटन होय, असा विचार त्यांनी मांडला आहे. जातिधर्म हा सनातन धर्माचा एक भाग नसून तसे मानणे हा समजूतीचा एक घोटाळा आहे, हे त्यांनी दुसऱ्या लेखात पटवून दिले आहे. वेदकाळात निर्माण झालेल्या व हजारो वर्षापासून प्रचलित असलेल्या चातुवर्ण्य व्यवस्थेतून जातिसंस्थेची निर्मिती झाली आहे. त्यामुळे जातिव्यवस्था ही प्राचीन वर्णव्यवस्थेचा एक भाग आहे,

ही समजूत सावरकरांना मान्य नाही. त्यांच्यामते, जातिसंस्था हे वर्ण-व्यवस्थेचे विशुध्द स्वरूप नसून विकृत स्वरूप आहे आणि समजुतीच्या घोटाळ्यामुळे "चातुर्वर्ण्य हा सनातन धर्म आहे म्हणून म्हणणारे लोकच त्या चातुर्वण्याचा जवळजवळ उच्छेद करून टाकणाऱ्या या जातिभेदाचे कट्टर शत्रू असावयास पाहिजेत. पण आश्चर्य असे की, हे लोक चातुर्वर्ण्यास व जातिभेदांस दोघांसही सनातन धर्म समजतात,"[२७] हे सांगून सावरकरांनी समजुतीचा घोटाळा दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याद्वारे जातिसंस्थे-विषयी असलेला समाजाचा जो पारंपारिक अंधविश्वास आहे त्यालाच सावरकरांनी आपल्या तर्कशुध्द विचारांनी धक्का दिला आहे व "चातुर्वर्ण्य काय आणि जातिभेद काय दोन्हीही आचार आहेत - सनातन धर्म नव्हे"[२८] हे त्यांनी स्पष्ट केले आहे.

वस्तुत: पूर्वीकधी हिन्दू समाजात चार वर्ण अस्तित्त्वात होते व त्यातून आजच्या हजारो जातींची निर्मिती झाली ही जातींची ऐतिहासिक उत्पत्ती सावरकरांना मुळीच मान्य नाही. परंतु तसे जरी गृहित धरले तरी वर्णातून जातीची निर्मीती झाली असे समजण्यास कोणताच प्रत्यक्ष पुरावा नाही, हे सावरकरांनी "सनातर धर्म म्हणजे जातिभेद नव्हे" या लेखाच्या उत्तरार्धात स्पष्ट केले आहे. या लेखात सावरकर लिहितात, "पूर्वीची वर्णव्यवस्था लवचिक होती. तिला आजच्या जातिव्यवस्थेसारखे रोटीबंद, बेटीबंद स्वरूप प्राप्त झाले नव्हते. ही वर्णव्यवस्था खऱ्या अर्थाने गुण व कर्म यावर आधारलेली होती. या काळात वर्णा-वर्णात रोटीव्यवहार इतकेच नव्हे तर अनुलोम व प्रतिलोम विवाहाची पध्दत रूढ होती आणि तरीदेखील कुणीही जातिच्युत होत नसे. हे त्यांनी "महाभारत" व इतर धर्मग्रंथांचा आधार घेऊन स्पष्ट केले आहे.[२९] या वर्ण व्यवस्थेतून जातिसंस्थेची निर्मिती झाली व कालांतराने तिचे स्वरूप हळूहळू परिदृढ व चिरेबंदी बनत गेले. या बदलत्या जातिसंस्थेचे व अनिष्ट जातिप्रथेचे स्वरूप सावरकरांनी स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, या जातिभेदाने जाति-जातीत अहंकार व अतिरेकी जात्यभिमान निर्माण केला. आज या जातिभेदाने

शेकडो-हजारो जाति व उपजाति निर्माण केल्या आहेत आणि या सर्व जातीचे स्वरूप रोटीबंद व बेटीबंद आहे "भागांचे विभाग, विभागांची शकले, शकलांचे राई-राई एवढे तुकडे करून टाकले या जातिभेदाने"[30] हा जातिभेद सनातन धर्म नाही तर ते धर्माचे अत्यंत बीभत्स स्वरूप आहे हे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सावरकरांनी जातिभेदाचे वर स्पष्ट केलेले स्वरूप अतिशयोक्तीचे नसून वस्तुस्थितीचे निदर्शक आहे, हे काही तत्त्वांचा आधार घेऊन तिस-या लेखात स्पष्ट केले आहे. याच लेखात मूळच्या चार किंवा पाच वर्णांचे हजारो जातीत पर्यवसान कसे झाले हे त्यांनी- १) वर्णविशिष्ट जातिभेद, २) प्रांतविशिष्ट जातिभेद, ३) पंथविशिष्ट जातिभेद, ४) व्यवसायविशिष्ट जातिभेद, ५) आहारविशिष्ट जातिभेद, ६) संकरविशिष्ट जातिभेद या सहा तत्त्वांच्या आधारे स्पष्ट केले आहे आणि त्याद्वारे पूर्वीच्या चातुर्वर्ण्याचा हा प्रस्तुतचा जातिभेद उच्छेद आहे,[31] हे त्यांनी सांगितले आहे.

अशा या हानिकारक व अनिष्ट जातिभेदाच्या निर्मितीला व अस्तित्वाला ब्राह्मण व क्षत्रिय वर्ण जितका जबाबदार आहे तितका कनिष्ठ वर्णही जबाबदार आहे. कारण कनिष्ठ वर्णांनी जातिभेदाला अप्रत्यक्षपणे संमती देऊन त्याचे अस्तित्व व वर्चस्व हजारो वर्षे मान्य केले आहे. त्यादृष्टीने सावरकरांनी सर्व जाति व वर्णांना सारखाच दोष दिला आहे. म्हणून ते म्हणतात, "आपल्या जात्यहंकाराचे स्तोम माजविण्यातच या संस्थेचा ज्याने त्याने उपयोग केला आहे आणि त्या उपयुक्ततेकरिता तिला ज्याने त्याने या वा त्या प्रमाणात उचलून धरले आहे ही खरी वस्तुस्थिती आहे."[32] म्हणून या जातिभेदाचे उच्चाटन करण्याची जाबाबदारी सर्व जाति व वर्णांची आहे, असे ते म्हणतात. त्यामुळे त्यांनी जातिभेद निर्मूलनाचा सार्वत्रिक किंवा सामुहिक स्वरूपाचा कार्यक्रम सांगितला आहे.

जातिभेदाच्या निर्मूलनासाठी सावरकरांनी जो उपाय सुचविला आहे तो अत्यंत साधा व सोपा आहे. त्यासाठी सावरकरांनी जातिभेदाची भावना किंवा आचार बदलण्यास सांगितले आहे. त्यांचा संपूर्ण जातिसंस्थेला, तिच्या अस्तित्वाला विरोध नव्हता तर तो जातिभेदाच्या अनिष्ट व घातक आचाराला होता. म्हणूनच जातिसंस्था समूळ नष्ट करुन संपूर्ण हिन्दू समाज एकवर्णी करण्याची कल्पना त्यांनी कधीच मांडली नाही. तर तिच्यातील दोष टाळून तिची नव्या परिस्थितीनुसार पुनर्घटना करण्याचा विचार मांडला आहे. तो विचार म्हणजेच "जन्मजात जातिभेदाचा उच्छेद व गुणजात जातिभेदाचा उध्दार" हा होय. थोडक्यात सावरकरांनी पुन्हा एकदा गुण व कर्म यावर आधारलेल्या जातिसंस्थेला मान्यता दिली आहे. असा हा जन्मजात जातिभेद उच्चाटण्यासाठी त्यांनी सप्तबंदीच्या बेड्या तोडण्याचा कार्यक्रम सांगितला आहे. अशाप्रकारे त्यांची जातिभेदनिर्मूलनाची कल्पना व त्याअनुषंगाने स्पष्ट केलेला सप्तबंदी तोडण्याचा कार्यक्रम सर्वस्वी नवीन व क्रांतीकारी नसला तरी तो सूत्रबध्द अशा स्वरुपाचा आहे.

## ४. जातिसंस्था विज्ञानाविरुध्द:

सावरकर प्रखर विज्ञाननिष्ठ होते. त्यांच्या इतर सर्व निष्ठांमध्ये हिन्दुत्वनिष्ठा ही आद्यनिष्ठा होती. तरीदेखील त्यांच्या समग्र विचारांमध्ये विज्ञाननिष्ठा, बुध्दीवाद व वस्तुनिष्ठा यांचा सातत्याने प्रत्यय येतो. लहानपणी ते काहीसे दैववादी आणि धर्मभोळे होते. परंतु त्यानंतरच्या काळात विज्ञानाचे महत्त्व जाणवल्यामुळे सावरकरांनी सर्वच व्यवहारात विज्ञान हीच कसोटी मानली आहे. आधुनिक काळात विज्ञानाशिवाय तरणोपाय नाही आणि विज्ञान हेच खरे सामर्थ्य आहे, बळ आहे हे त्यांनी अचूक ओळखले. त्यांनी विज्ञानाचा, शास्त्रीय प्रवृत्तीचा आधार घेऊन हिन्दू राष्ट्र अधिक समर्थ व बलवान करण्याचा प्रयत्न केला आहे.

A 9694

सावरकरांनी व्यक्तीगत जीवनात कधीही जाति, भेद, जातिबंधाने मा मानली नाहीत. विज्ञानाच्यादृष्टीने जे जे उपयुक्त ते ते सर्व त्यांनी योग्य व व्यवहार्य मानले आहे. सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनेही सावरकरांनी विज्ञान हीच कसोटी मानली आहे. शास्त्रीयदृष्टी, लोकहितपरता व हिन्दू राष्ट्राच्या हितसंवर्धनाचे ध्येय ही त्यांच्या विचारांची त्रिसूत्री होती. या विज्ञाननिष्ठ भूमिकेतून सावरकरांनी हिन्दू राष्ट्र, हिन्दू समाज व या समाजातील चालीरिती यांचा परामर्श घेतला आहे. त्यांनी विज्ञाननिष्ठा व हिन्दुत्वनिष्ठा या दोन्ही दृष्टीने हिन्दू राष्ट्र संघटनेचा विचार मांडला आहे.

विज्ञानाच्या आधारे दैववाद व जातिभेदाने पछाडलेल्या आणि पीडलेल्या हिन्दू समाजाला मुक्त करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. विज्ञान, मानवहित व उपयुक्तता या तीन निकषांवर आधारलेल्या सुधारणावादाचा स्वीकार करावा असा विचार ते सर्वत्र मांडतात. त्यादृष्टीने जन्मनिष्ठ व मानीव जातिभेदावर आणि धर्मग्रंथांच्या प्रामाण्यावर ते टीकेचे प्रहार करतात. समाजहिताचा विचार करून समाजसुधारणा केली पाहिजे हा उपयुक्ततावादी विचार त्यांनी मांडला आहे. या संदर्भात सावरकर म्हणतात, "आजच्या परिस्थितीत विज्ञानाच्या कसोटीला उतरतील त्या समाजसुधारणा आपण तात्काळ घडवून आणल्या पाहिजेत. अमक्या सुधारणेस शास्त्राधार आहे का ? हा प्रश्न दुय्यम. आपल्या हिन्दू राष्ट्राच्या संघटनास आणि अभ्युदयास अमकी सुधारणा आजच्या परिस्थितीत आवश्यक आहे ना ? हा प्रश्न मुख्य. मग त्यास शास्त्राधार असो वा नसो."[33] अशी वैज्ञानिक भूमिका ते सामाजिक सुधारणेच्या संदर्भात मांडतात. सुधारणावाद व विज्ञानवाद यांचा एकत्रित विचार मांडून सावरकर म्हणतात की आज काय योग्य आहे हे सांगण्याचा अधिकार

प्रत्यक्ष व प्रयोगक्षम विज्ञानाला आहे. आपल्या धर्मग्रंथातील विचार, आचार, आहार, जातींची श्रेष्ठ-कनिष्ठता या सर्व गोष्टींच्या योग्या-योग्यतेची कसोटी त्यांच्यामते विज्ञान हीच आहे. पाच हजार वर्षांपूर्वी पोथ्यांत सांगितलेली प्रत्येक गोष्ट आजच्या विज्ञानाच्या कसोटीवर पारखून घेतली जावी आणि ती प्रत्यक्षनिष्ठ विज्ञानाच्या विरुद्ध जाताच टाकाऊ समजावी,[34] असा निर्णय ते देतात.

विज्ञान आणि धर्म याविषयी विचार मांडताना सावरकर म्हणतात, कोणताही समाज परंपराप्रिय असतो. त्या परंपरा धर्मातून निर्माण होतात. परंतु काळानुसार धर्माला अपरिवर्तनीय स्वरूप येते. समाजाची प्रगती खुंटते. समाज स्वत:च्याच कालबाह्य रूढींचे अनुकरण करतो आणि विषमतेच्या गतानुगतिकतेच्या गर्तेत बुडतो. अशावेळी विज्ञानाचा आधार घेऊन समाजातील कालबाह्य रूढी मोडून काढल्या पाहिजेत. ज्या समाजांनी अशा रूढी मोडल्या. त्यांची प्रगती झाली त्यासाठी हिन्दू समाजानेदेखील विज्ञानाच्या कसोटीला उतरतील त्या सुधारणांचा स्वीकार केला पाहिजे. विज्ञान हेच शाश्वत असल्याने हिन्दूंनी विज्ञान हाच धर्म मानावा.

आजच्या काळात संस्कृती व धर्म यातील जे अनुकरणीय, उदात्त, प्रगत व प्रबुद्ध ठरते तेच स्वीकार्य आहे. त्याचा स्वीकार आणि संरक्षण म्हणजे धर्मरक्षण व संस्कृतीरक्षण होय.

धर्म, संस्कृती याबरोबरच हिन्दु धर्माचे सनातन वैशिष्टय असलेल्या जातिसंस्थेचा विचारही सावरकरांनी विज्ञाननिष्ठ भूमिकेतून केला आहे. सावरकरांनी हिन्दू राष्ट्राचे संघटन व संवर्धन यादृष्टीने जातिभेद निर्मूलनाचा विचार मांडलेला असला तरी त्या विचारांना विज्ञाननिष्ठ प्रवृत्तीची जोड आहे. विज्ञानाचे आजच्या युगातील महत्त्व सांगत असतानाच आजचा जातिभेद विज्ञानाविरुद्ध कसा आहे हे त्यांनी अनेक लेखांमधून स्पष्ट केले.

हिन्दू समाजात प्रचलित असलेले जातिभेद निव्वळ मानीव व पोथीजात असून त्यांना विज्ञानाचा कोणताही आधार नाही. विज्ञानाच्या आधारावर जातिसंस्थेचे समर्थन करता येत नाही. अशा जातिभेदाचे निर्मूलन करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारुन काहीबदल केले पाहिजेत, असे त्यांना वाटते. जातिभेदाचे निर्मूलन करण्यासाठी "जन्मजात जातिभेदाचा उच्छेद व गुणजात जातिभेदाचा उद्धार" असा उपाय सांगितला. त्याच्या मूळाशी असलेली त्यांची वैज्ञानिकदृष्टी आढळून येते. तत्कालीन समाज सुधारणेच्या सर्व उपायांपेक्षा हा उपाय सर्वस्वी भिन्न व वैशिष्टयपूर्ण असा आहे.

जातिसंस्था व जातिभेदाच्या समस्येचा विचार त्यांनी विज्ञानवादी दृष्टीकोनाबरोबरच उपयुक्ततावादी दृष्टीकोनही स्वीकारला. त्याआधारे जातिभेदाविषयी प्रचलित असलेल्या गैरसमजांचे खंडन केले. एकीकडे जाति-संस्था मानीव व पोथीजात कशी आहे हे सांगत असतानाच दुसरीकडे जाति-जातीमधील तटबंदी विज्ञानाविरुद्ध कशी आहे हे सांगितले.

### जात्युच्छेदक निबंधांचे महत्त्व:

सावरकरांच्या सामाजिक व राजकीय विचारामध्ये "जात्युच्छेदक निबंधांचे महत्त्व फार मोठे आहे. १९३० साली "केसरी"त त्यांनी लिहिलेले नऊ लेख किंवा निबंध म्हणजेच "जात्युच्छेदक निबंध" होय. जन्मजात जातिभेद हा हिन्दू समाजाच्या -हासास कसा कारणीभूत आहे व त्यामुळे हिन्दू समाज सतत विघटीत व दुर्बल कसा होत आहे आणि तो पुन्हा समर्थ व्हावा, भारताला पूर्वीचे वैभव पुन्हा प्राप्त व्हावे या-साठी काय केले पाहिजे या सर्व मुद्यांच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी "जात्युच्छेदक निबंध" लिहिले.

या निबंधांमधून त्यांची शास्त्रीय प्रवृत्ती, हिन्दू राष्ट्रवाद, सुधारणावाद, उपयुक्ततावाद याविषयीचे विचार व्यक्त झाले आहेत. सबळ व संघटित हिन्दू राष्ट्राच्या निर्मितीसाठी त्यांनी जात्युच्छेदनाची आवश्यकता या निबंधांमधून सांगितली आहे. तसेच जात्युच्छेदनासाठी काय केले पाहिजे याचे मार्गदर्शनही त्यात केले आहे. जात्युच्छेदनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा व कार्यक्रम त्यात सांगितला आहे. भारतातील जन्मजात जातिभेदाचे स्वरूप, त्याची निर्मिती, जन्मजात जातिभेदाने निर्माण केलेल्या सप्तबंदीचे स्वरूप, तिचे अनिष्टत्व, त्यावरील उपाय तसेच जातिभेद मोडायचा म्हणजे काय करायचे या विषयांवर व समस्यांवर त्यांनी सविस्तरपणे विचार मांडले आहेत. सावरकरी वाङ्मयात हे निबंध महत्त्वाचे आहेत.

सामाजिक सुधारणा व जातिभेद निर्मूलनाच्यादृष्टीने या निबंधांचे महत्त्व फार मोठे आहे. तसेच शास्त्रीय आणि वैज्ञानिक दृष्टीनेदेखील त्यांचे महत्त्व मोठे आहे. काळाची पावले ओळखून काळानुरूप योग्य ते बदल आपल्या समाजरचनेत व जीवनपध्दतीत केले पाहिजेत असे आधुनिक विचार त्यांनी या निबंधामधून मांडले आहेत. तसेच त्यातून त्यांनी केवळ सामाजिक दोषांची व वाईट प्रवृत्तींची चिकित्सा केलेली नाही तर त्यांचे निवारण करण्यासाठी काय केले पाहिजे याचे मार्गदर्शनही केले आहे. थोडक्यात, त्यांचे "जात्युच्छेदक निबंध" सामाजिक क्रांतीचा मंत्र देणारे ठरले आहेत.

पहिल्या लेखात "हिन्दू" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाची जडणघडण चातुर्वर्ण्य व जातिभेद यांनी कशी परिबध्द होती आणि ते या समाजाचे व्यवच्छेदक लक्षण कसे होते, तसेच या काळात हिन्दू समाज चार वर्णांच्या चौकटीत कसा बंदिस्त करण्यात आला, हे त्यांनी स्पष्ट केले. वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्था कशी सुरचितपणे निर्माण होत गेली[35] याचे

ही विवेचन त्यांनी केले आहे. या निबंधामधून त्यांची जातिप्रथानिर्मूलन व अस्पृश्यता निवारण याविषयीची भूमिका स्पष्ट होते. त्यांनी ही दोन्ही सर्वस्वी भिन्न कार्ये मानली आहेत.

दुसऱ्या व तिसऱ्या लेखात सावरकरांनी जातिप्रथा सामाजिक भेदाभेद याविषयी असलेल्या अनेक गैरसमजांचे खंडन करून जातिप्रथेचे खरे स्वरूप स्पष्ट केले आहे. तसेच"सनातन धर्म म्हणजे जातिभेद नव्हे" तर तो चातुर्वर्ण्याचा मूर्तिमान उच्छेद आहे,[36] हे स्पष्ट केले. जातिभेदाला धर्माचे कोणतेही अधिष्ठान नाही तर जातिभेद ही केवळ एक प्रथा किंवा आचार आहे. अशा या मानीव जातिभेदाने हिन्दू समाजाचा कसा अधःपात केला आहे हे त्यांनी सांगितले. अर्थात् "सनातन धर्म म्हणजे जातिभेद नव्हे" हे सांगणे एवढाच सावरकरांचा या लेखामागचा हेतू नाही, तर जातिनिर्मूलनासाठी कांही उपाय सुचविणे या दुहेरी हेतूने त्यांनी हा लेख लिहिला आहे.

"ह्या आपत्तीवर उपाय काय ?" या लेखात त्यांनी जातिभेद निर्मूलनाचे कांही व्यावहारिक उपाय सांगितले आहेत. हे उपाय अत्यंत साधे व सोपे आहेत. त्यासाठी त्यांनी जातिभेदाची भावना किंवा आचार बदलण्यास सांगितले आहे. सावरकरांचा संपूर्ण जातिसंस्थेला, तिच्या अस्तित्वाला विरोध नव्हता तर तो जातिभेदाच्या अनिष्ट व घातक आचाराला होता.[37] असा अनिष्ट आचार टाळण्यासाठी त्यांनी "जन्मजात जातिभेदाचा उच्छेद व गुणजात जातिभेदाला मान्यता" असा उपाय सांगितला. थोडक्यात् त्यांनी पुन्हा एकदा गुण व कर्म यावर आधारलेल्या जातिव्यवस्थेला मान्यता दिली. तिचे पुनरुज्जीवन करण्याचा विचार मांडला. त्यातून सांगितलेला व्यावहारिक उपयुक्ततावाद व सुधारणावाद बऱ्याच प्रमाणात समाजहितासाठी अनुकूल व पोषक आहे, असे म्हणावे लागते. या उपायाचे समर्थन करताना अनुवंश व गुणविकासाच्या दृष्टीने उपयुक्त असलेल्या लोक

हितकारक मूल्यांवर ते भर देतात. आजच्या विकृत जातिभेदाच्या मुळाशी जी लोकहितकारक मूल्ये आहेत त्यांना धक्का न लावता जी इतर हानिकारक तत्त्वे आहेत ती टाळण्याचा विचार ते मांडतात. म्हणूनच जाती व वर्ण-संस्था अनुवंशिक गुणविकासाच्या दृष्टीने आवश्यक व उपकारक असून जन्मजात जातिभेदापेक्षा गुणजात जातिभेदानेच जातिसंस्थेपासून होणारे दोष टाळता येतील[38] असे त्यांना वाटते.

सावरकरांनी जातिभेद निर्मूलनाचा विचार सर्वस्वी वेगळया दृष्टीकोनातून मांडला आहे. जाती व वर्णसंस्थेच्या मुळाशी लोकउपकारक तत्त्वे असली पाहिजेत हा विचार ते मान्य करतात. जातिसंस्थेतील अनुवंशाचे तत्त्व त्यांना समाजहिताच्या दृष्टीने उपयुक्त वाटते.

## जातिसंस्था व हिंदुत्त्वाचे राजकारण:

आपल्या विविध भाषणांतून आणि निबंधांतून स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी जातिसंस्थेवर कठोर प्रहार केले. जात्युच्छेदक निबंधात त्यांनी हिंदुराष्ट्राच्या बळकटीसाठी, निर्मितीसाठी जातींचा उच्छेद करणे कसे आवश्यक आहे हे मोठया आग्रहाने मांडले. सावरकर हे हिंदू धर्माचे कडवे अभिमानी होते. त्यांच्या समग्र वाङ्मयातून हिंदु राष्ट्राचा विचार प्रभावीपणे व्यक्त झाला. भारताच्या उत्थानाला हिंदुत्त्वाशिवाय पर्याय नाही असे त्यांचे मत होते. त्यांच्या जातिसंस्थाविषयक विचारास हिंदु-त्त्वाचा हा व्यापक संदर्भ प्राप्त झालेला होता.

स्थानबध्दतेतून मुक्तता झाल्यानंतर त्यांनी हिंदुत्त्वाचा स्पष्टपणे व विशेष आग्रहाने पुरस्कार करावयास सुरुवात केली. वास्तविक अंदमानात जाण्यापूर्वी ते व्यापक राष्ट्रवादी भूमिकेचा विचार करीत होते. परंतु अंदमानात असताना त्यांनी मुस्लीमांचे हिन्दूंच्या धर्मान्तराचे प्रकार पाहिले.

ते प्रकार बंद करण्यासाठी व हिन्दूधर्माला लागलेली गळती थांबविण्यासाठी त्यांनी हिन्दुत्वाचा विचार प्रभावीपणे मांडला.[३९] संपूर्ण हिन्दुसमाजात नवा विचार उत्पन्न व्हावा असे त्यांना वाटत होते. त्यादृष्टीने त्यांनी मांडलेला भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व इतिहासविषयक असा सर्वस्पर्शी विचार हिन्दुत्वाच्या एकमेव सिध्दान्ताभोवती फिरत होता.

सावरकरांच्या राजकारण व समाजकारण यांचा केंद्रबिन्दू हिन्दू समाज होता. हिन्दुस्थान अजिंक्य व अविभक्त असावा. त्यास पूर्वीचे वैभव प्राप्त व्हावे, असे त्यांना प्रकर्षाने वाटत असे. त्यांचे हिन्दुत्वनिष्ठ विचार हे त्यांच्या प्रखर राष्ट्रवादाचे मूलस्वरूप आहे. आपल्या हिन्दू राष्ट्रविषयक संकल्पनेला त्यांनी "हिन्दुत्व" किंवा "हिन्दूराष्ट्र" म्हटले असले तरी तो आधुनिक भारतीय राष्ट्रवाद आहे.[४०] यापूर्वी राष्ट्रवादी विचार अनेकांनी स्पष्ट केला. परंतु भारतात सर्वप्रथम या विषयावर लेखन सावरकरांनी केले. यादृष्टीने ते आधुनिक राष्ट्रवादी विचारांचे दार्शनिक ठरतात.[४१] त्यांनीच सर्वप्रथम सांस्कृतिक एकतेवर आधारलेला हिन्दू राष्ट्रवाद सांगितला.

राष्ट्रात बहुसंख्य असलेल्या हिन्दूंच्या बळकट पायावर एकात्म हिन्दू समाजाची स्थापना करणे हे आपले राजकीय उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी आपल्या जीवित कार्याची त्रिसूत्री सांगितली ती अशी:

१) हिन्दुस्थानचे राजकीय स्वातंत्र्य हे ध्येय.
२) या ध्येयासाठी जमेल त्या साधनांचा वापर आणि
३) हिन्दूंचे पुनरुत्थान.

हिन्दुत्वाची कल्पना विशद करताना सावरकर म्हणतात, "कर्मठ विधीविधान सोडा नि जातिभेदाच्या बेडया तोडा, असे म्हणत असूनही मी हिन्दु संघटनाचा आग्रह का धरतो ? कारण हिन्दुत्व हे हिन्दु धर्माहून अधिक व्यापक आहे.

हिन्दुत्व हे हिन्दूच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय नि भाषिक अशा सर्व ऐहिक बाजूंचा विचार करते."[४२] "हिन्दुराष्ट्र", "हिन्दुत्व" या कल्पने-बरोबरच सावरकरांनी "हिन्दू" ही संकल्पना विस्ताराने स्पष्ट केली आहे. हिन्दू हा शब्द धर्मवाचक नसून समाजवाचक शब्द आहे, असे ते म्हणतात.

सावरकरांची हिन्दुत्वाची कल्पना राजकीय आहे. त्यांना हिन्दु-त्वाच्या कक्षेत जैन, शिख, ख्रिश्चन इ. बसवायचे आहे. पण मुस्लिमांना दूर ठेवायचे आहे.[४३] सर्व माणसे समान आहेत अशी सावरकरांची भूमिका कधीच नव्हती. सर्व हिन्दू तेवढे समान असून समर्थ हिन्दुराष्ट्रासाठी जे जे उपकारक ते ते स्वीकार्य असे त्यांचे तत्त्व होते. परंतु समर्थ हिन्दूराष्ट्र निर्मितीच्या मार्गात जातिभेद, पोथीनिष्ठा, सामाजिक विषमता, जात्यहंकार यासारख्या समस्या आहेत. त्यांच्या सावरकरांनी हिन्दुत्वनिष्ठ भूमिकेतून परामर्श घेतला. त्यामुळे एकाबाजूस हिन्दुत्वाच्या व्यापक तत्त्वावर हिन्दुराष्ट्राचे संघटन करणे व दुसऱ्या बाजूस हिन्दू राष्ट्राच्या अवनतीस कारणीभूत होणाऱ्या रूढींचे उच्चाटन करणे अशी सावरकरांच्या विचारांची व कृतीची दोन प्रमुख अंगे होती.

बुध्दीनिष्ठा, विज्ञानवाद, आधुनिकता यांच्या आधारे त्यांनी जातिभेद, सामाजिक विषमता यावर मूलगामी टीका केली. या सर्व मानीव प्रथा नष्ट करण्याची आवश्यकता हिन्दुत्वाच्या दृष्टीकोनातून सांगितली. या सर्वांचा उपयोग हिन्दुसंघटन व हिन्दुत्वाचा परिपोष यासाठी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यासाठी बुध्दीवाद, ऐहिकता, विज्ञाननिष्ठा, आधुनिकता ही साधने त्यांनी मानली. या साधनांच्या सहाय्याने हिन्दुराष्ट्रनिर्मितीचे अंतिम ध्येय प्राप्त करण्याचा विचार त्यांनी मांडला.

"हिन्दुत्व हेच राष्ट्रीयत्व" किंवा या देशात हिन्दूंचे स्वयंभू राष्ट्र आहे या विचारांचा त्यांनी पुरस्कार केला. म्हणूनच डॉ. आंबेडकरांच्या "समतासंघास" २४ ऑगस्ट १९२८ रोजी लिहिलेल्या उत्तरात सावरकरांनी म्हटले आहे की, "मला जातिभेद नको असला तरी आज हिन्दुत्व हवे आहे."[४४] त्यांच्या विचारांमध्ये हिन्दुत्वाची कल्पना मध्यवर्ती असल्याने त्यांनी हिन्दूंच्या व हिन्दू राष्ट्राच्या उत्कर्षाचा विचार सातत्याने मांडला. हिन्दू लोक सर्वश्रेष्ठ आहेत व हिन्दू राष्ट्र प्रबळ, बलाढ्य बनावे, अशी त्यांची विजिगीषूवृत्ती होती. परंतु आजच्या हिन्दू राष्ट्राची असंख्य जाती, उपजातींनी शकले उडविली आहेत. त्यामुळे ते एकसारखे विघटीत व पराजित होत आहे. या जाती जातिंमधील तटबंदी दूर केल्याशिवाय प्रबळ हिन्दू राष्ट्र निर्माण होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. प्राचीन काळात हिन्दू संस्कृतीचे संरक्षण करण्याच्या हेतूने निर्माण झालेल्या बेटीबंदी, रोटीबंदी, शुध्दीबंदीसारख्या बेड्या नंतरच्या काळात हिन्दू राष्ट्राच्या एकात्म स्वरूपावर घातक परिणाम करण्यास कारणीभूत ठरल्या. प्राचीन काळात जातिव्यवस्थेचे स्वरूप कसे होते व ते हिन्दू समाज एकात्म ठेवण्यास कसे कारणीभूत ठरले याचे सविस्तर विवेचन सावरकरांनी केले.

हिन्दूवर मुस्लिमांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या त्याच्या पुष्कळ आधीपासून हिन्दू समाजाची राजकीय, सामाजिक, धार्मिक रचना करण्याचा प्रयत्न हिन्दूस्थानच्या नेत्यांनी केला. अशा नवरचनेतून या विशाल हिन्दू समाजाची घडी जातिभेदाच्या चौकटीत बसविण्याचे प्रयत्न सुरु झाले. ह्या जातिभेदाला नंतरच्या काळात जन्मजात जातिभेदाचे स्वरूप प्राप्त झाले. पूर्वीच्या चार वर्णांतून बळकटपणे, शास्त्रसंमतपणे व सर्वसंमतपणे चार सहस्त्र जन्मजात जाती निर्माण झाल्या व त्यात पूर्वीचा एकात्म समाज विभागला गेला.[४५] अशी जातिंच्या निर्मितीची कारणमीमांसा ते करतात.

जन्मजात जातिसंस्थेच्या निर्बंधामधून रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदीसारख्या हिन्दूच्या प्रगतीलाच नव्हे तर गतीला पायबंद घालणाऱ्या सात बेड्या निर्माण झाल्या.[४६] अर्थात या सप्तबंदीने सामाजिक बीज, रक्त, जातिजीवन नि परंपरा शुध्द राखण्याचे कार्य केल्याबद्दल सावरकर कृतज्ञता व्यक्त करतात. अनेक वर्षे लोटली, संकटे आली तरी जातिसंस्था अबाधित राहिली. याचे कारण जातिव्यवस्था प्राचीन काळात उपयुक्त व आवश्यक ठरली असे त्यांचे मत आहे.

एकात्म व सबळ हिन्दू राष्ट्राचा विचार करीत असताना सावरकरांच्या असे लक्षात आले की, "जन्मजात जातिभेद हे हिन्दू राष्ट्राच्या अपकर्षाचे एक बलवत्तर कारण आहे."[४७] अतिरेकी जातिवेडाने हिन्दू राष्ट्राच्या स्थैर्यास व उत्कर्षास धोका निर्माण झाला. या जातिभेदाच्या विळख्यानी हिन्दू राष्ट्राच्या सामर्थ्याचे हातपाय बांधले गेले. या पोथीजात जातिभेदाने आपल्या हिन्दू राष्ट्राची हानि केली.[४८] त्याने हिन्दू राष्ट्राची शकले केली.[४९] यातून सावरकरांनी जन्मजात जातिभेद हिन्दू राष्ट्राच्या ऐकतेच्या मार्गात कसा अडथळा निर्माण करीत आहे, याचे विवेचन त्यांनी हिन्दुत्वनिष्ठ भूमिकेतून केले आहे.

हिन्दू राष्ट्राचे ऐक्य निर्माण करण्यासाठी "हिन्दू धर्माच्या व हिन्दू राष्ट्राच्या मुळासच लागलेली ही जन्मजात म्हणविणाऱ्या पण पोथीजातच असणाऱ्या जातिभेदाची कीड मारल्यावाचून तो संघटित व सबळ होऊन आजच्या जीवनकलहात टिकाव धरु शकणार नाही."[५०] त्यासाठी हा पोथीजात जातिभेद आमूलाग्र उच्छेदिणे हेच आजच्या आपल्या हाऱ्या हिन्दू राष्ट्राच्या उध्दाराचे एक अपरिहार्य साधन होऊन बसलेले आहे. हे ध्येय त्यांनी प्रथम निश्चित केले. कारण आजच्या जन्मजात जातिभेदाचा उच्छेद

केल्यावाचून हिन्दू राष्ट्राचे सामुहिक ऐक्य, पराक्रम नि प्रगती क्षमता वाढणे दुर्घट आहे हे सावरकरांनी जाणले. त्यासाठी या जातिभेदाचे निर्मूलन करण्याचा संकल्प त्यांनी सोडला.

जातिभेदाच्या घातक रुढीमुळे हिन्दू राष्ट्राचे वैभवशाली सामर्थ्य हळूहळू पण निश्चितपणे ऱ्हास पावत गेले. "अगदी इसवी सनाच्या अकराव्या व बाराव्या शतकापर्यंत जातिभेदाच्या क्षयाने आमच्या नाडया आखडत आल्या".[५१] सावरकरांच्या मते आपली पूर्वीची साम्राज्ये आणि स्वातंत्र्य जाण्यास केवळ जातिभेद हेच एक कारण नसले तरी ते निर्बल होण्यास जन्मजात जातिभेद हे कारण ठरले आहे. या जातिभेदाने जसे हिन्दू राष्ट्र निर्बल बनविले आहे तसेच अतिरेकी जातिवेडाने हिन्दू समाजजीवनही पोखारले आहे. त्यामुळे एकाच वेळी दोन्ही बाजूंनी राष्ट्राच्या सामर्थ्याचा ऱ्हास होऊ लागला.[५२] जातिभेदाचा विपरित परिणाम हिन्दूच्या समाज जीवनाप्रमाणेच राष्ट्रीय ऐक्यावरही झाला असा जन्मजात जातिभेद निर्माण करुन हिन्दू समाजाने आपला आत्मघात करुन घेतला आहे.[५३]

अशाप्रकारे हिन्दू राष्ट्रनिर्मितीचा व सामर्थ्याचा विचार मूलभूत मानून त्याच्या परिपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या जाती व धर्म सुधारणेचा विचार सावरकरांनी मांडला. आणि त्यासाठी राजकारण करावयास ते सज्ज झाले. हिंदु महासभा या पक्षामध्ये त्यांनी प्रवेश केला.

## हिन्दू महासभेचे राजकारण:

सावरकरांची राष्ट्रनिष्ठा हिन्दूपुरती व हिन्दू राष्ट्रापुरती मर्यादित होती. एकात्महिन्दू राष्ट्राच्या कल्पनेत त्यांनी अखिल हिन्दू समाजाचा समानतेने विचार केला. हिन्दू समाजाचा व एकात्म हिन्दू राष्ट्राच्या

पुनरुध्दाराच्या ध्येयाचा त्यांनी अनेकदा पुनरुच्चार केला. हे ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी राजकारण, समाजकारण या सर्व साधनांचा वापर केला. हिन्दू समाजातील जातीय विषमता मोडून काढण्याच्या ध्येयासाठी त्यांनी समाजकारण केले तर हिन्दूंच्या बळकट पायावर हिन्दू राष्ट्राची निर्मिती करण्यासाठी त्यांनी राजकारणाचा मार्ग स्वीकारला. हे एक ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी स्वतंत्र हिन्दू राष्ट्राच्या निर्मितीची रूपरेषा निश्चित केली आहे.

१० मे १९३७ या दिवशी सावरकरांवरील सर्व निर्बंध निघाले आणि ते हिन्दू राष्ट्राच्या राजकीय समस्यांकडे, राजकीय संघटनाच्या कार्याकडे वळले. १९३७ साली स्थानबध्दतेतून मुक्तता झाल्यानंतरची सावरकरांची भूमिका पाहिली तर ती हिन्दु राष्ट्राच्या, हिन्दुत्वाच्या विचारांनी प्रेरित झालेली दिसून येते. हिन्दुराष्ट्राचे स्थैर्य, अस्तित्व व उत्कर्ष मूलभूत मानून त्यांनी आपल्या समाजकारण व राजकारणाची दिशा निश्चित केली. "हिन्दू हा या देशाचा पाया आहे."[५४] हे त्यांच्या विचारांचे मुख्य सूत्र आहे. अंदमानात गेलेले सर्व हिन्दूच होते.[५५] फासावर ज्यांना टांगले ते हिन्दूच होते[५६] असे त्यांचे मत होते. १९३७ च्या नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अकोला येथे भरलेल्या अखिल हिन्दू परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात हिन्दू राष्ट्रवादाचे विवेचन करताना सावरकर म्हणाले, "वस्तुत: जो समाज देशात बहुसंख्य असतो त्यांचाच तो देश मानला जाण्याची प्रथा सर्व जगात आहे. या नात्याने तर हिन्दुस्थान हिन्दूचाच आहे."[५७] अशा अनेक उद्गारांमधून, विधानांमधून हिन्दू राष्ट्राच्या संघटनाचा विचार त्यांनी सातत्याने मांडला आहे.

समग्र हिन्दू समाजाच्या पायावर हिन्दू राष्ट्राची निर्मिती करणे हे संपूर्णपणे राजकीय ध्येय आहे. राजकारणाच्या मार्गाने जाऊन हे ध्येय

साध्य करावे लागेल अशी सावरकरांची भूमिका होती. १९३७ मध्ये राजकीय निर्बंधातून मुक्तता होताच सावरकरांनी या राजकीय ध्येयाच्या प्राप्तीसाठी राजकारणाच्या मार्गाचा अवलंब केला.

१ ऑगस्ट १९३७ या दिवशी सावरकरांनी आपला लोकशाही स्वराज्य पक्षात सामील झाल्याचे जाहिर केले.[५८] परंतु थोड्याच दिवसांत ते हिन्दू महासभेस मिळाले. सावरकरांनी सतत हिन्दुत्वाचे रक्षण हेच ध्येय ठेवले. त्यामुळे हिन्दुत्वरक्षण, हिन्दू राष्ट्राचा उत्कर्ष याच हेतूने त्यांनी राजकारणही केले. सावरकरांनी पक्षनिष्ठ राजकारणाऐवजी हिन्दुत्वनिष्ठ राजकारणाला प्राधान्य दिले आहे आणि त्यासाठी ज्या पक्षाची विचार-सरणी, कार्यपध्दती त्यांना योग्य व त्यांच्या ध्येयाशी सुसंगत वाटली त्या पक्षात त्यांनी प्रवेश केला. सावरकरांनी कोणत्याही एका राजकीय पक्षाची बांधिलकी कधीही स्वीकारली नाही. त्यामुळे कोणत्याही पक्षाच्या विचारसरणीशी स्वत:ला बांधून घेण्यापेक्षा त्यांनी स्वत:च्या विचार-सरणीशी सुसंगत असलेल्या राजकीय पक्षात प्रवेश केला. त्यादृष्टीने हिन्दु महासभा ही हिन्दूंच्या हिताचे, अधिकारांचे व हिन्दुत्वाचे रक्षण करणारी संस्था आहे[५९] असा दावा त्यांनी केला. त्यानंतरच्या काळात त्यांनी हिन्दू महासभेच्याद्वारे आपली हिन्दुत्व तत्त्वप्रणाली राजकीय व राष्ट्रीय पातळी-वर आणण्याचा प्रयत्न केला.

हिन्दू महासभेच्या ध्येयधोरणांच्या प्रचारासाठी सावरकरांनी झंझावती दौरे काढले आणि जम्मू-काश्मीरपासून मद्रास त्रावणकोरपर्यंत निसिंध प्रांतापासून ते आसामपर्यंत सर्व भारतभर हिन्दुत्वाच्या तत्वाचा प्रचार केला. या तत्त्वासाठी अनेक चळवळी केल्या, लढे लढविणे, मत प्रचार केला. १९३७ साली अहमदाबाद येथे भरलेल्या हिन्दू महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून प्रथम निवडले गेले. त्यानंतर नागपूर (१९३८), कलकत्ता (१९३९), मदुरा (१९४०), भागलपूर (१९४१), कानपूर

कानपूर (१९४२), व अमृतसर (१९४३) येथे भरलेल्या हिन्दू महासभेच्या अधिवेशनांचे अध्यक्षपद त्यांनी सतत सात वर्षे भूषविले.

सावरकर कृतिशील राजकारणी होते. त्यांनी राजकीय तत्त्वज्ञानाप्रमाणे राजकीय कृतिलाही महत्त्व दिले. त्यासाठी त्यांनी हिंदुत्त्वनिष्ठ भूमिकेतून हिंदुराष्ट्राच्या विविध राजकीय समस्यांचा परामर्श घेतला. सावरकरांची हिंदुराष्ट्राच्या स्वातंत्र्याची कल्पनादेखील हिंदुत्त्वाच्या तत्त्वावर आधारलेली आहे. केवळ प्रादेशिक किंवा भौगोलिक स्वातंत्र्याची कल्पना त्यांना अयोग्य व अपुरी वाटते. तर आपले हिंदुत्त्व उत्कटपणे व प्रभावीपणे प्रस्थापित करता येईल असे स्वातंत्र्य सावरकरांना हवे होते. त्यादृष्टीने "ज्यात हिन्दू संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन होईल तेच स्वराज्य" अशी स्वराज्याची व्याख्या त्यांनी केली. आणि या स्वराज्याच्या प्राप्तीसाठी जे जे उपयुक्त त्या सर्व मार्गांचा, साधनांचा त्यांनी अवलंब केला.

हिन्दू महासभेद्वारे सावरकरांनी "हिन्दुत्त्वाचा अर्थ", "हिन्दुत्त्वातील राष्ट्रीयत्व", "कांग्रेसची राष्ट्रीयता", "हिन्दु महासभेचे राष्ट्रीयत्त्व" अशा अनेक विषयावर आपली मते मांडली. १९३७ पासून १९५० पर्यंत त्यांनी राजकारणात सक्रीय सहभाग घेऊन हिंदुत्त्वाच्या रक्षणासाठी प्रयत्न केले.

आपल्या १९३७-१९४५ या हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाच्या काळात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदुमहासभेला बळ देण्याचा प्रयत्न केला. अखंड भारत राहिला पाहिजे आणि हिंदुस्थान हे हिन्दूंचे राष्ट्र आहे. असा विचार त्यांनी मांडला. त्यांचे जातिविरोधाचे राजकारण हे हिन्दुसंघटनाच्या व्यापक राजकारणाचाच एक भाग होते. म. गांधी व कांग्रेस पक्ष मुसलमानांचा अतिरेकी अनुनय करीत असल्यामुळे त्यांनी त्या पक्षावर व म. गांधी यांच्यावर कठोर टीका केली. पण सावरकरांच्या जातिविरोधी

विचारांना संपूर्ण हिंदूमहासभापक्ष बांधलेला नव्हता. त्या पक्षात मुसलमानांचा द्वेष करणारे व सनातन हिंदूधर्माचा पुरस्कार करणारेच जास्त होते. त्यामुळे त्या पक्षाने जातियतेच्या विरोधी मोहीम काढली नाही.[६१] त्याचप्रमाणे त्या पक्षाची फारशी संघटना नसल्यामुळे राजकीय दृष्ट्या सावरकर तसे अयशस्वीच ठरले. १९३७ व १९४६ च्या निवडणुकीत हिंदुमहासभेचा फारसा टिकाव लागला नाही.

टीकात्मक मूल्यमापन:

सावरकरांचे सामाजिक आणि राजकीय विचार तसेच कार्य आधुनिक भारतीय विचारांना नवे वळण देणारे ठरले. हिन्दू समाजातील दोषांचा व्यापक व आधुनिक दृष्टीकोनातून त्यांनी परामर्श घेतला. त्यादृष्टीने त्यांच्या विचारांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या विचारांची उपयुक्तता मान्य करीत असताना त्यातील दोष व अपूर्णता याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

सावरकरांच्या जातिमीमांसा व समाजसुधारणा याविषयीच्या विचारांवर पाश्चात्य विचारांचा फार मोठा प्रभाव होता. त्याच भूमिकेतून त्यांनी भारतातील जातिप्रथेचा विचार केला. त्यामुळे स्पृश्यास्पृश्यता, सामाजिक विषमता, भेदाभेद यांच्या राजकीय व आर्थिक स्वरूपाकडे त्यांनी दुर्लक्ष केले. त्याचे राजकीय व आर्थिक आधार त्यांनी पुरेसे विस्ताराने स्पष्ट केले नाहीत. जातिसंस्था हिन्दू उत्कर्षाला व अपकर्षाला सारखीच जबाबदार आहे असे म्हणताना त्याच्या साधार स्पष्टीकरणाची आवश्यकता त्यांना वाटत नाही.

जातिप्रथा व सामाजिक स्थित्यंतरे तसेच जातिप्रथेचे समाजावरील परिणाम याविषयी त्यांनी केलेले विवेचन सर्वस्पर्शी, सखोल नाही. आर्थिक हितसंबंध व आर्थिक आधार या मुद्यांचा विचार त्यांनी केलेला

नाही. तसेच प्राचीन भारतीय समाजरचनेचे आकलन होण्यास सामाजिक स्थित्यंतराची प्रक्रिया समजण्यास त्यांच्या विवेचनाचा फारसा उपयोग होत नाही. जातिप्रथेविषयी व समाजस्थितीविषयी विचार मांडताना अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांनी गृहित धरली आहेत. त्यांचे स्पष्टीकरण करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला नाही. त्यासाठी ऐतिहासिक दाखले, पुरावे देऊन स्वमताचे विवेचन केलेले नाही.

जातिसंस्थेचा सामाजिक व राजकीय भूमिकेतून विचार केल्यामुळे त्यांच्या विचारावर काही मर्यादा पडल्या. त्यामुळे त्यांचे विचार जातिव्यवस्थेचे केवळ बाह्यांग स्पष्ट करु शकले. मात्र तिची अंत:सूत्रे स्पष्ट करु शकले नाहीत. तसेच जातिभेदाच्या निर्मूलनाविषयीची त्यांची भूमिका बरीच संदिग्ध आहे. जातिनिर्मूलन व अस्पृश्यता निवारण यात फरक केल्यामुळे त्यांच्या स्वतंत्र व सूत्राबध्द विवेचनाची जबाबदारी त्यांनी मानलेली नाही. जातिभेद निर्मूलनाच्या उपायांची व जातिसमस्येची मूलगामी चिकित्सा त्यांनी केलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचार प्रत्यक्षात आणताना काही व्यावहारिक अडचणी निर्माण झाल्या.

सावरकरांना संपूर्ण जातिनिर्मूलन हवे होते की गुणाधिष्ठित वर्णव्यवस्था हवी होती हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. कुठे कुठे ते गुणाधिष्ठित वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करीत असतानाही आपणास दिसतात. अशा प्रकारची विचारांची संदिग्धता जातिनिर्मूलनाच्या कार्यात अडथळा निर्माण करते.

सावरकरांच्या जातिनिर्मूलनाचे विचार हे एक सबळ हिन्दुराष्ट्र निर्मितीच्या साध्याचे साधन होते. आंबेडकरांचे जातिनिर्मूलन हे साध्य होते तर सावरकरांचे ते साधन होते. राष्ट्रनिर्मिती, विज्ञाननिष्ठ समाजाची स्थापना

या गोष्टी बलवान हिन्दुत्वासाठीच आवश्यक होत्या. त्यामुळे सावरकरांच्या विचारावर उपयुक्ततावादाचा प्रभाव पडला. मुसलमानांचा द्वेष हा पण मग जातिनिर्मूलनाच्या कार्याचाच एक भाग झाला.

...........

## प्रकरण दुसरे

## सं द र्भ

### स्वा. वि.दा. सावरकर यांचे जातिनिर्मूलनाविषयीचे विचार


| | | |
|---|---|---|
| १) | फडके य.दि.- शोध सावरकरांचा | पृ.क्र. ६. |
| २) | उक्त | पृ.क्र. ९. |
| ३) | फडके य.दि.- तत्त्वज्ञ सावरकर निवडक विचार प्रस्तावना | पृ.क्र. ५. |
| ४) | फडके य.दि.- शोधा सावरकरांचा | पृ.क्र. १० |
| ५) | उक्त | पृ.क्र. ३४ |
| ६) | उक्त | पृ.क्र. ४६ |
| ७) | उक्त | पृ.क्र. ५९ |
| ८) | सावरकर वि.दा.- माझी जन्मठेप | पृ.क्र. २९९ |
| ९) | उक्त | पृ.क्र. २९९ |
| १०) | फडके य.दि.- शोधा सावरकरांचा | पृ.क्र. ५५ |
| ११) | उक्त | पृ.क्र. ६२ |
| १२) | कीर धनंजय-स्वातंत्र्यवीर सावरकर | पृ.क्र.१९७. |
| १३) | उक्त | पृ.क्र. १९७ |
| १४) | उक्त | पृ.क्र. २००. |
| १५) | सावरकर वि.दा.- समग्र सावरकर वाङ्मय-खंड ३ | पृ.क्र. ६५. |

१६) सावरकर वि.दा.- समग्र सावरकर वाङ्मय खंड ३ पृ.क्र. ४९७

१७) उक्त पृ.क्रे. ४९७

१८) उक्त पृ.क्र. ४९८

१९) उक्त पृ.क्र. ४९९

२०) उक्त पृ.क्र. ४९९

२१) उक्त पृ.क्र. ४९९

२२) उक्त पृ.क्र. ४९९

२३) कीर धनंजय-स्वातंत्र्यवीर सावरकर पृ.क्र. १५७.

२४) केळकर भा.कृ- समाज सुधारक सावरकर पृ.क्र. ८९

२५) सावरकर वि.दा. - समग्र सावरकर वाङ्मय खंड ३ पृ.क्र. ४३३

२६) उक्त पृ.क्र. ४३३

२७) उक्त पृ.क्र. ४४३

२८) उक्त पृ.क्र. ४४४

२९) उक्त पृ.क्र. ४४५

३०) उक्त पृ.क्र. ४४५

३१) उक्त पृ.क्र. ४४९

३२) उक्त पृ.क्र. ४५१

३३) सावरकर वि.दा - समग्र सावरकर वाङ्.मय खंड ३ पृ.क्र. ४९५

३४) उक्त पृ.क्र. ४९५

३५) उक्त पृ.क्र.४४३

३६) उक्त पृ.क्र. ४४३

३७) उक्त पृ.क्र. ४५३

३८) उक्त पृ.क्र. ४५४

३९) फडके य.दि. - सं. तत्त्वज्ञ सावरकर-निवडक विचार पृ.क्र. ९२

४०) स्वा. सावरकर यांच्या तेजस्वी जीवनावरील अलौकिक पृ.क्र. २८

४१) विशेषांक - २१ जुलै १९८६

४२) उक्त पृ.क्र.२८

४३) कीर धनंजय - स्वातंत्र्यवीर सावरकर पृ.क्र. २४०

४३) स्वा. सावरकर यांच्या जीवनावरील अलौकिक विशेषांक पृ.क्र. ३८ व ३९
२१ जुलै १९८६.

४४)

४४) सावरकर वि.दा.- समग्र सावरकर वाङ्.मय खंड ३ पृ.क्र. ६४२

४५) सावरकर वि.दा.-समग्र सावरकर वाङ्.मय - खंड ४ पृ.क्र. ७०९

४६) सावरकर वि.दा.- इतिहासाची सहा सोनेरी पाने पृ.क्र. ३७

४७) सावरकर वि.दा.-समग्र सावरकर वाङ्.मय खंड ४ पृ.क्र. ४३३

४८) -"- खंड ३ पृ.क्र. ५००

४९) सावरकर वि.दा.- समग्र सावरकर वाङ्.मय खंड ३ पृ.क्र. ४९५

५०) उक्त पृ.क्र. ४८६

५१) उक्त पृ.क्र. ४३८

५२) उक्त पृ.क्र. ४३८ व ४३९

५३) सावरकर वि.दा.-इतिहासाची सहा सोनेरी पाने पृ.क्र. ४३

५४) सावरकर वि.दा.- समग्र सावरकर वाङ्.मय खंड ४ पृ.क्र. ३५५

५५) उक्त पृ.क्र. ३५५

५६) उक्त पृ.क्र. ३५५

५७) कीर धनंजय - स्वातंत्र्यवीर सावरकर पृ.क्र. २४१

५८) उक्त पृ.क्र. २३८

५९) सावरकर वि.दा.-समग्र सावरकर वाङ्.मय खंड ४, पृ.क्र.३४७

६०) Keer Dhananjaya - Savarkar and His Times. पृ.क्र. २२२

६१) डॉ.देशपांडे स.ह. पारमार्थिकांनी केलेला सावरकरांचा पराभव, मौज दिवाळी १९८९.


..........